खरेदी

# आवडती सायकल, आवडते कार्टून

'सायकल' म्हणजे लहान मुलांचा जीव की प्राण. त्यातही जर त्यांच्या आवडत्या कार्टूनच्या डिझाइनमध्ये त्यांची सायकल मिळत असेल तर? 'एल ए सॉवरेन बायसिकल प्रा. लिमिटेड'ने नुकत्याच बाजारात 'अँग्री बर्ड्स' सायकल्स आणल्या आहेत. 'ड्रीम थिएटर प्रा. लि.' या कंपनीचं लायसन्स लाभलेल्या 'अँग्री बर्ड्स' या ब्रँडच्या



सायकलबरोबरच सायकलसाठी आवश्यक असलेल्या ॲक्सेसरीजही मिळू शकतील. सॅडल्स, बॅकरेस्ट पॅड्स,



स्टायलिस्ट बेल्स आणि हॉर्नस् आणि सायकल शिकत असताना तिला जोडली जाणारी जास्तीची दोन चाकं. या सर्वांचा या ॲक्सेसरीजमध्ये समावेश आहे. या सायकल अगदी रंगीत आणि मोठी कार्टून असलेल्या आहेत. त्यामुळे मुलांना या अँग्री बर्ड्स सायकल्स नक्कीच आवडतील. या सायकल भारतातल्या ४० शहरांमध्ये असलेल्या एल ए सॉवरेनच्या शोरूम आणि इतर मोठ्या सायकल विक्रेत्यांकडे उपलब्ध आहेत.

**किंमत :** पाच ते सहा हजारांपर्यंत...